
भगवान बुद्धांचे अग्रश्रावक

# सारिपुत्त

(महाप्रज्ञावानांत अग्र)

(मराठी)



विपश्यना विशोधन विन्यास

# भगवान बुद्धांचे अग्रश्रावक

# सारिपुत्त

## (महाप्रज्ञावानांत अग्र)

(मराठी)

विपश्यना विशोधन विन्यास
धम्मगिरी, इगतपुरी

# M44 - सारिपुत्त

© विपश्यना विशोधन विन्यास
सर्वाधिकार सुरक्षित

प्रथम आवृत्ती : नोव्हेंबर 2022

**मूल्य: ₹**

**Price: Rs.**

ISBN 978-81-7414-456-0

**प्रकाशक:**

**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मागिरी, इगतपुरी - ४२२ ४०३
जिल्हा: नाशिक, महाराष्ट्र
फोन: ०२५५३-२४४९९८, २४४०७६,
२४४०८६, २४४१४४, २४४४४०,
Email: vri_admin@vridhamma.org
Website: www.vridhamma.org

**मुद्रक:**

**अपोलो प्रिंटिंग प्रेस**
२५९, सीकॉफ लिमिटेड, ६९ एम. आय. डी. सी.,
सातपुर, नाशिक-४२२००७, महाराष्ट्र

## भगवान बुद्धांची उद्घोषणा

*************************************

**“एतदग्गं, भिक्खवे, मम सावकानं भिक्खूनं**
**महापञ्ञानं यदिदं सारिपुत्तो।”**

********

**“भिक्षूंनो! माझ्या महाप्रज्ञावान भिक्षू श्रावकांत अग्र**
**(श्रेष्ठतम) आहेत सारिपुत्त.”**

*************************************

*– अंगुत्तरनिकाय (१.१.१८९)*

# आयुष्मान सारिपुत्त

# आयुष्मान सारिपुत्त

## अनुक्रमणिका

**प्रकाशकीय ........................................................9**
**अमृताचा शोध ....................................................15**
जन्म तसेच नामकरण ..............................................15
धर्मचक्षू उघडले.......................................................15
प्रव्रज्या.....................................................................19
आयुष्मान सारिपुत्तची अर्हत्व-प्राप्ती.................................20
**वैयक्तिक साधनेचे प्रसंग............................................23**
मोह-क्षयाने भिक्षू स्थिर व शांत ......................................23
आश्रवांपासून मुक्त करणारी प्रतिपदा..................................23
सात बोध्यंगात विहार.....................................................24
नऊ ध्यानांचा साक्षात्कार..................................................25
कल्याणमित्राचे महत्व ....................................................27
महापुरुष कोण असतो? ..................................................28
संक्षिप्त तसेच विस्तृत उपदेश ..........................................29
**प्रज्ञावानांत अग्र ........................................................31**
सारिपुत्तांची ओळख........................................................31
सारिपुत्तांप्रति भगवानांचा भाव.........................................32
आयुष्मान वंगीसद्वारे आयुष्मान सारिपुत्तांची स्तुती ................34
प्रज्ञेने परिनिर्वाणाची प्राप्ती................................................35
बुद्धांचा सर्वश्रेष्ठ पुत्र ........................................................36
सेनापती कोण आहे? .......................................................37
महाप्रज्ञावान सारिपुत्त.......................................................38
धर्मसेनापती सारिपुत्त .......................................................40

**बुद्धां-समान उपदेश ........................................ 42**

शिष्यांनी माझे ‘धर्म-दायाद’ बनावे ........................................ 43

कुशलधर्मांच्या ऱ्हासाची ओळख ........................................ 44

सेवनीय-असेवनीय धर्म ........................................ 44

उपादान-स्कंधांच्या मननाचे फळ ........................................ 45

पंच उपादान-स्कंध आणि त्यांचा निरोध ........................................ 46

स्रोतापत्तीचे अंग आणि स्रोतापन्न ........................................ 47

दुःख प्रतीत्य-समुत्पन्न आहे ........................................ 48

गृहस्थ जीवनात परतण्याचे कारण ........................................ 50

विरोधी भावांच्या शमनाचे उपाय ........................................ 51

‘सम्यकदृष्टी’ची व्याख्या ........................................ 54

**महाश्रावकांसोबत संवाद ........................................ 57**

अनुरुद्धांच्या अडचणीचे निवारण ........................................ 57

बोध्यंगांच्या सिद्धीचे ज्ञान ........................................ 58

स्रोतापन्न चार गुणांनी युक्त ........................................ 58

पाच गुणांनी युक्त आयुष्मान आनंद ........................................ 60

अनुरुद्धांची प्रशंसा ........................................ 60

स्पर्शायतन निरोधच प्रपंचाचा अंत ........................................ 61

अव्याकृत ........................................ 62

अनातापी आणि अनोत्तापी ........................................ 63

**धम्म-दान ........................................ 65**

लकुंडकाला बहुविध धर्म समजाविला ........................................ 65

प्रमादी धनंजानीला सुधारले ........................................ 66

भोजनदान फलीभूत झाले ........................................ 67

अनाथ कोळी-पुत्राला धर्मदान ........................................ 68

सहभिक्षूच्या मिथ्याधारणेचे निवारण ........................................ 70

चित्त व्याकुळ न होय! ........................................ 73

**आयुष्मान सारिपुत्त आणि विनय ........................................ 77**

आजारी सारिपुत्तांची सेवा ........................................ 77
लसूण खाण्याची अनुमती ........................................ 78
अतिरिक्त चीवर ठेवण्याचे विधान ........................................ 79
दान अनुमोदनाचा नियम ........................................ 80
अग्रपिंडासाठी योग्य भिक्षू ........................................ 81
धर्मानुसार व्यवहार ........................................ 83
घातक महत्वाकांक्षेची शिकार ........................................ 85
**दुर्मनाची दुर्गती ........................................ 87**
क्रोधाने उत्पन्न दाह ........................................ 87
घमेंडखोराचे तोंड बंद ........................................ 88
काषाय वस्त्र धारण करण्यासाठी अयोग्य पात्र ........................................ 90
संघात फूट ........................................ 92
दुर्मुख कोकालिक ........................................ 93
**आयुष्मान सारिपुत्तांचा भिक्षू परिवार ........................................ 95**
अनुशासनप्रिय राहुल ........................................ 95
आरण्यक खदिरवनिय रेवत ........................................ 97
प्रत्युत्पन्नमति (हजर जबाबी) राध ........................................ 99
सुभाषी उपसेन ........................................ 101
अरहंत संकिच्च ........................................ 102
वनवासी तिस्स ........................................ 105
सिवली ........................................ 107
पंडित श्रामणेर ........................................ 108
महाचुंद ........................................ 110
सारिपुत्तांच्या बहिणी ........................................ 111
कुमापुत्त नंद ........................................ 111
महावच्छ ........................................ 111
**गुणांचे भांडार ........................................ 112**
अनुकरणीय आदर्श ........................................ 112
असे म्हणतात भगवान ........................................ 112

आचार्य पूजक ........................................................113
अग्रश्रावकांची परस्पर-स्तुती ...........................................114
भिक्षूनो! माझा पुत्र तृष्णारहित आहे ...............................115
डोक्यावर यक्षाचा प्रहार ..............................................116
निष्कासनावरही समताभाव ............................................117
सारिपुत्तांना क्रोध येत नाही ..........................................119
स्थविरांचा मालपुवा त्याग ............................................121
धर्मपूर्वक आहार-ग्रहण ...............................................121

**विविध प्रसंग........................................................123**

बुद्ध अतुलनीय .......................................................123
पुण्णचे पुण्य जागले ..................................................124
सालवनाचे आत्यंतिक वर्णन..........................................125
'ब्राह्मण' चा 'साधने' शी मेळ........................................127
ब्रह्मलोकात पोहोचण्याचा खरा मार्ग...............................127
संयतेंद्रिय गृहस्थाची घोषणा ........................................129
एकांत प्रीती-सुख.....................................................131
धर्मरत्नाचा सत्कार ...................................................132

**परिनिर्वाण-लाभ ...................................................134**

परिनिर्वाणाची अनुमती...............................................134
मातृ-सेवा..............................................................136
भव-संसरणापासून मुक्ती.............................................136
दाह-संस्कार..........................................................137
सारिपुत्तांप्रित आनंदची कृतज्ञता ...................................138
बुद्धांना कोणता शोक नाही..........................................140
देहधातू.................................................................140

**अतीत कथा........................................................141**

**विपश्यना साधना केंद्र..............................................144**

# प्रकाशकीय

थेरगाथेच्या अट्ठकथेत भगवान बुद्धांच्या ऐंशी ‘महाश्रावकां’ची नावे गणली गेली आहेत. त्यापैकी भगवान बुद्धांच्या प्रज्ञावानांमध्ये अग्र महाश्रावकांत आयुष्मान सारिपुत्तांचे नाव सर्वात प्रमुख आहे. या पुस्तकात या महाश्रावकाचा जीवनवृत्तांत प्रस्तुत केला जात आहे.

---------

महाजनपद मगधची राजधानी राजगहजवळ नाळकग्रामात वंगन्त आणि रूपसारी नावाच्या ब्राह्मण दंपतीपासून उपतिस्स (सारिपुत्त) चा जन्म झाला. ही दंपती महाधनवान व संपत्तीशाली होती. वंगन्त गावाचे प्रमुख होते. त्यांना सात संतती झाल्या – चार पुत्र (उपतिस्स, उपसेन, महाचुंद आणि रेवत) तसेच तीन पुत्री (चाला, उपचाला व सिसूपचाला). परंपरेनुसार सर्वात जेष्ठ पुत्राचे नाव गावाच्या नावावर उपतिस्स पडले. कालांतराने उपतिस्स सारिपुत्तच्या नावाने प्रसिद्ध झाले. अपार भौतिक संपत्तीचा वारस असूनही सर्वात मोठा पुत्र उपतिस्सची रुची धर्म-संपत्तीकडे वाढत गेली.

तो आपल्या लहानपणीचा मित्र कोलित (मोग्गल्लान) सोबत आपल्या अपार वैभव-संपदेचा त्याग करुन सत्याच्या शोधात निघाला. उपतिस्स व कोलितच्या परिवाराचा मागील सात पिढ्यांपासून संबंध चालत आला होता, त्यामुळे लहानपणापासूनच या दोघांचा अतिघनिष्ठ संबंध होता, दोन्ही परिवार खूप धनाढ्य होते.

जन्म व मृत्यूच्या दुःखाचे भव-संसरण चालतच राहते. यापासून मुक्ती कशी प्राप्त करता येईल? त्यांना याचाच शोध घ्यायचा होता. दोघांनी प्रव्रज्या घेतली. सर्वप्रथम त्यांनी परिव्राजक आचार्य संजयचे शिष्यत्व ग्रहण केले. परंतु ते यामुळे संतुष्ट झाले नाहीत. त्यानंतर त्यांनी जंबुद्वीपा (भारता)च्या अन्य विद्वानांशीही संपर्क साधला परंतु तरीही ते संतुष्ट झाले नाहीत.

त्यानंतर ते एक दुसऱ्यापासून वेगळे होऊन आचार्यांचा शोध घेऊ लागले, त्यांनी आपसात हा निर्णय केला होता की जो कोणी कुशल आचार्यांना प्राप्त करण्यात प्रथम सफल होईल त्याने याची माहिती दुसऱ्याला ताबडतोब द्यावी.

एक दिवस राजगृहाच्या गल्लीत फिरताना उपतिस्सची भेट भिक्षू अस्सज्जी यांच्याशी झाली. उपतिस्स आयुष्मान अस्सजींच्या चेहऱ्यावरील तेज आणि शांती तसेच त्यांच्या संयमित चालीने व वागणुकीने अत्यंत प्रभावित झाला. उपतिस्सला वाटले की अवश्य या व्यक्तीने अमृत-अवस्था प्राप्त केली आहे. उपतिस्सने त्यांना विचारले "आपले शास्ता कोण आहेत? त्यांची काय शिकवण आहे, त्यांचा काय वाद आहे?"

उपतिस्सने अत्याधिक आग्रह केल्यावर आयुष्मान अस्सजींनी भगवानांच्या शिकवणुकीबाबत सांगतांना म्हटले –

**"जे काही कारणाने उत्पन्न होते, त्याचे कारण तथागत सांगतात व त्याचा निरोधही सांगतात. महाश्रमणांचा हाच वाद आहे, हेच कथन आहे, हीच शिकवण आहे".**

पूर्वजन्मांच्या संचित पुण्य पारमितांच्या फळस्वरूपामुळे उपतिस्सला थोडक्यातच सर्व बाब समजली. भगवान भव-संसरणाच्या दु:खाची उत्पत्ती आणि त्यांचा निरोध शिकवतात, त्याला हेच पाहिजे होते. त्याचे विरज, विमल धर्मचक्षू उघडले. त्याने स्रोतापन्न अवस्थेचा साक्षात्कार केला.

उपतिस्सने सारी बाब आपला बालसखा कोलितला सांगितली. उपतिस्सची वाणी ऐकता-ऐकता, त्याचेही धर्मचक्षू उघडले. कोलितनेही अमृतपान केले आणि स्रोतापन्न अवस्थेचा साक्षात्कार केला.

उपतिस्स आणि कोलित भगवानांना शरण गेले. त्यांना पाहताच भगवान बुद्धांनी घोषणा केली की हे दोघेही (सारिपुत्त व मोग्गल्लान) माझे अग्रश्रावक होतील.

वेळ येताच दोघांनीही अरहंत अवस्थेचा साक्षात्कार केला. भगवान बुद्धांनी आपल्या भिक्षू श्रावकांत महाप्रज्ञावानांमध्ये आयुष्मान सारिपुत्तांना अग्र घोषित केले तसेच आयुष्मान मोग्गल्लानांना ऋद्धिमानांमध्ये अग्र घोषित केले.

धर्मसेनापती सारिपुत्तांची प्रशंसा करतांना भगवानांनी म्हटले "भिक्षूंनो! सारिपुत्त अर्थज्ञ, धर्मज्ञ, मात्रज्ञ, कालज्ञ व परिषदेचे जाणकार आहेत. या पाच बाबींनी युक्त सारिपुत्त तथागतांद्वारे प्रवर्तित अनुपम धर्मचक्राला

यथायोग्य रीतीने अनुप्रवर्तित करतात, फिरवतात, पुढे वाढवतात. त्या धर्मचक्राला लोकात कोणीही अप्रवर्तित करु शकत नाही, त्याला मागे फिरवू शकत नाही".

हे दोन्ही अग्रश्रावक भगवानांच्या शिकवणुकीच्या प्रचार-प्रसारात भगवानांना मदत करीत असत. संघाच्या संचालनातही भगवानांची मदत करीत. आयुष्मान सारिपुत्त चारही परिषदां (भिक्षू, भिक्षुणी, उपासक, उपासिका) च्या धर्मासंबंधी शंकांचे समाधान करीत असत. ते लोकांना भगवान बुद्धांप्रमाणेच उपदेश करीत. सारिपुत्त चार आर्यसत्यांना खूप उत्तम प्रकारे समजावू शकत होते, तर मोग्गल्लान ऋद्धिबळाने साधकांना खूप उत्तम प्रकारे प्रशिक्षित करु शकत होते. आयुष्मान सारिपुत्तच्या प्रज्ञापूर्ण वृत्तांताचा उल्लेख त्रिपिटकात अनेक ठिकाणी प्राप्त होतो.

आयुष्मान सारिपुत्तांनी आयुष्मान अनुरुद्धांच्या साधनेत विघ्न पाहिले तेव्हा त्यांना सचेत करतांना म्हटले "आयुष्मान अनुरुद्ध! तुमच्या आत जो अहंकार आहे, बेचैनी आहे, पश्चाताप आहे, त्या तिन्ही धर्मांना त्यागून चित्ताला निर्वाणाकडे केंद्रित करा." असे केल्यावर आयुष्मान अनुरुद्ध लवकरच निर्वाणलाभी झाले.

आयुष्मान सारिपुत्तांनी आयुष्मान आनंदला सांगितले की जेव्हा कोणी आर्यश्रावक बुद्ध, धर्म व संघाच्या गुणांच्या प्रती अटळ श्रद्धेने युक्त असतो, तसेच अच्छिद्र, निर्मल, विद्वानांद्वारे प्रशंसाप्राप्त शील असणारा असतो, तेव्हा या चार धर्मांनी युक्त आर्यश्रावक स्रोतापन्न होतो. मग तो धर्ममार्गापासून दूर जाऊ शकत नाही, त्याचे संबोधि प्राप्त करणे सुनिश्चित होते.

एका अन्य प्रसंगात आयुष्मान सारिपुत्तांनी आयुष्मान महाकोट्ठिकला सहा स्पर्शायतनांचा निरोध व त्याच्या प्रपंचाबाबत माहिती देताना म्हटले "आयुष्मान जिथपर्यंत सहा स्पर्शायतनांची सीमा आहे, तिथपर्यंतच प्रपंचाचीही सीमा आहे. जिथपर्यंत प्रपंचाची सीमा आहे, तिथपर्यंतच स्पर्शायतनांचीही सीमा आहे. सहा स्पर्शायतनांचा नि:शेष निरोध झाल्यामुळे प्रपंचाचा निरोध होतो. तेव्हा प्रपंचाचा निरोध झाल्यामुळे स्पर्शायतनांचे शमन होते".

एका प्रसंगी आयुष्मान सारिपुत्तांनी आयुष्मान महाकस्सपला अनातापी (जो आपल्या क्लेशांना तापवत नाही), अनोत्तापी (जो क्लेश जागृत झाल्यावर सावधान राहात नाही) व आतापी (आपल्या क्लेशांना तापवत राहाणारा) आणि ओत्तापी (क्लेशांच्या उत्पन्न झाल्यावर सावधान राहाणारा) च्या बाबत माहिती दिली. हे ही सांगितले की केवळ आतापी व ओत्तापीच परमपद निर्वाणाचा साक्षात्कार करु शकतात.

आयुष्मान आनंदला आयुष्मान सारिपुत्तांबाबत खूप स्नेह होता. श्रावस्तीत भगवानांनी आयुष्मान आनंदला विचारले – “आनंद! तुला सारिपुत्त चांगला वाटतो ना? यावर आयुष्मान आनंद भगवानांना म्हणाले – “भंते! मूर्ख, दुष्ट, मूढ आणि लहरी यांना सोडून असे कोण असेल ज्याला महास्थविर सारिपुत्त आवडत नसतील!”

आयुष्मान सारिपुत्तांनी आयुष्मान आनंदची प्रशंसा करतांना म्हटले – “आयुष्मान आनंद अर्थकुशल, धर्मकुशल, व्यंजनकुशल, निरुक्तीकुशल, पूर्वापरकुशल आहेत”.

भगवानांनी श्रावकांच्या परिषदेत धर्मोपदेश देतांना हे प्रज्ञप्त केले – “जर तुम्ही घरातून बेघर व्हाल तर तसेच बना जसे सारिपुत्त व मोग्गल्लान. माझ्या भिक्षू श्रावकांत हेच दोन आदर्श समजले जातात”.

भगवान बुद्धांनी सारिपुत्त व मोग्गल्लान आपले आदर्श शिष्य असल्याची घोषणा केली. भगवान आपल्या या दोन्ही अग्रश्रावकांच्या दर्शनासाठी भिक्षूंना सदैव प्रेरित करत राहायचे. “भिक्षूंनो! सारिपुत्त व मोग्गल्लानची संगत करा. ते ज्ञानी आहेत, पंडित आहेत, सब्रह्मचारींवर अनुग्रह करणारे आहेत. सारिपुत्त जन्म देणाऱ्या मातेसमान आहेत, तर मोग्गल्लान पोषण करणाऱ्या दाईप्रमाणे. सारिपुत्त स्रोतापत्ती फळात प्रतिष्ठित करतात तर मोग्गल्लान निर्वाणात”.

देवदत्तने भिक्षुसंघ फोडून पाचशे नवीन प्रव्रजित भिक्षूंना आपल्या सोबत गयासीसजवळ घेऊन गेल्यावर, भगवानांच्या सूचनेनुसार सारिपुत्त व मोग्गल्लान यांनी त्यांना आपल्या धर्मोपदेशाद्वारे तेथून परत संघात आणण्यात सफलता प्राप्त केली होती. ही एक महत्वपूर्ण घटना होती ज्याचे

श्रेय याच दोन अग्रश्रावकांना जाते.

आयुष्मान सारिपुत्तांकडून अनेकांनी प्रव्रज्या प्राप्त केली. धर्मसेनापती सर्वांची खूप काळजी घेत असत. ते त्यांच्या भौतिक व आध्यात्मिक आवश्यकतांची पूर्ती करीत असत. जेव्हा कधी भिक्षू आजारी पडायचे तेव्हा आयुष्मान सारिपुत्त त्यांची सेवा, सुश्रूषा करीत असत. या सर्वांना ध्यानाचे आलंबन सांगत असत. त्यांना स्रोतापत्ती फळात प्रतिष्ठित करीत असत.

धर्मसेनापती सारिपुत्तांची सहनशीलता अद्भुत होती. कोणत्याही स्थितीत राग न येण्याची त्यांची क्षमताही अद्भुत होती. एकदा एका अदृश्य प्राण्याने त्यांच्या डोक्यावर इतका तीव्र प्रहार केला की त्यामुळे जर सामान्यजन असता तर निष्प्राणच झाला असता अथवा त्याचे मस्तक निष्क्रिय झाले असते. परंतु आयुष्मान सारिपुत्त थोडेही विचलित झाले नाहीत. एका अन्य प्रसंगीही आईने सारिपुत्तांना टोचून बोलल्यावरही ते शांत राहिले.

भगवानांकडून विनयांच्या नियमांचा पाया ठेवण्याबाबत भगवानांना विनंती करण्याचे मुख्य श्रेयही आयुष्मान सारिपुत्तांना जाते. सारिपुत्तांसंबंधी घडलेल्या प्रसंगात भगवान बुद्धांनी विनयाचे अनेक नियम प्रज्ञप्त केले जसे – लसूणाचे सेवन, अतिरिक्त चीवर ठेवण्याचे विधान, दान अनुमोदनाचा नियम, अग्रपिंडासाठी योग्य भिक्षू, धर्मवादी व अधर्मवादीची ओळख इत्यादी.

महास्थविर सारिपुत्तांच्या कल्याणकारी शिकवणुकीमुळे ऐंशी हजार गृहस्थ दु:खमुक्तीचा मार्ग स्वीकारुन स्वर्गात उत्पन्न झाले. त्यांचे स्वत:चे तीन भाऊ व तीन बहिणी निर्वाणलाभी झाल्या. तरी अजूनही ते आपल्या मातेला बुद्धांनी सांगितलेल्या धर्ममार्गावर आकर्षित करु शकले नव्हते. मातेला आपल्या परंपरागत मान्यतांची व कर्मकाडांची गहन आसक्ती होती. धर्मसेनापती सारिपुत्त चांगले जाणत होते की मातेचे उपकार अनंत असतात. कोणत्याही पुत्रासाठी आपल्या आईची महान सेवा हीच आहे की तिला मुक्तीच्या मार्गावर घेऊन यावे.

आयुष्मान सारिपुत्तांच्या परिनिर्वाणाची वेळ जवळ आली. या कार्यासाठी त्यांनी आपल्या मूळ गावाला निवडले. भगवानांचा निरोप घेऊन आपल्या

पाचशे भिक्षू सहकाऱ्यांसह ते आपल्या घरी पोहोचले. आई भेटायला आली, तेव्हा तिने पाहिले की तिथे खूपसे प्रकाशमान अदृश्य प्राणी विद्यमान आहेत. आईने विचारल्यावर सारिपुत्तांनी तिला सांगितले – “हे चारही दिशांचे द्वारपाल महाराज होते, देवराज शक्र होते, ब्रह्मलोकाचे ब्रह्मा होते. ते सर्व अरहंताचे अंतिम दर्शन करण्यासाठी आले होते”.

हे ऐकून आई हर्षविभोर झाली. माझा पुत्र इतका ऋद्धिशाली व समृद्धीशाली आहे तर त्याचे आचार्य तर यापेक्षाही महान असतील. यावर आयुष्मान सारिपुत्तांनी भगवानांचे गुण गायले, ज्याला ऐकता-ऐकताच मातेचे शरीर पुलक-रोमांचाने भरुन गेले, ती स्रोतापन्न झाली. धन्य झाली माता! धन्य झाला पुत्र!

सूर्योदयापूर्वी प्रत्यूषकाळात धर्मसेनापतींनी आपल्या पाचशे भिक्षूंना बोलावून कक्षासमोरील खुल्या प्रांगणात बसवले आणि त्यांना म्हटले – “आपण सर्व पस्तीस वर्षांपासून माझ्यासोबत आहात. इतक्या कालावधीत मी शरीर किंवा वाणीने असे कोणतेही कर्म केले असेल जे आपल्याला दु:खद वाटले असेल, तर मला क्षमा करा”.

शिष्य म्हणाले, “भंते! आपण महान आहात! या पस्तीस वर्षात आमच्यापैकी कोणीही आपल्याप्रति कोणतेही पीडादायक कर्म केले असेल तर आपण आम्हाला क्षमा करा”. धर्मसेनापती संघाला म्हणाले – “तुम्ही सर्व पवित्र आहात, निर्दोष आहात!” इतके बोलून धर्मसेनापतींनी अंतिम श्वास सोडला आणि परिनिवृत्त झाले.

धन्य महान धर्मसेनापती! धन्य त्यांचा पावन भिक्षुसंघ!

---------

अशाच प्रकारे अन्य महाश्रावकांचे व महाश्राविकांचे जीवनवृत्तांतही प्रकाशित करण्याची योजना आहे, ज्यामुळे विपश्यी साधक-साधिका प्रेरणा प्राप्त करुन आपल्या जीवनात थोडासा तरी सुधार करु शकतील.

विपश्यना विशोधन विन्यास